जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन,नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र.जिवायो-1007/प्र.क्र.39/का-1444, दि.16 फेब्रुवारी, 2008
2. का.अ. (बांध), जिल्हा परिषद, परभणी यांचे पत्र क्र.जिप.बांध.लेखा1.कावि./1745/2019, दि. 01.03.2019

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/रस्ते जि.प./नि.वि./का.क्र.1/ 882 — दि.31 मार्च, 2019

**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2018-19 अंतर्गत निधी वितरण आदेश**

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन 2018-19 या वित्तीय वर्षामध्ये इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण (जि.प.) या योजनेसाठी रु.40.00 लक्षची तरतूद मंजूर झालेली असून कार्यकारी अभियंता, (बांध), जिल्हा परिषद, परभणी यांनी संदर्भ क्र.2 नुसार 3 कामांना **रु.60.00 लक्ष** च्या रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

कार्यकारी अभियंता, (बांध), जिल्हा परिषद, परभणी यांनी संदर्भ क्रं.2 अन्वये मागणी केल्यानुसार संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी जिल्हाधिकारी, परभणी या आदेशान्वये खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन खालील परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे सन 2018-19 मधील मंजूर कामांसाठी एकुण **रु.15.00 लक्ष (अक्षरी रुपये पंधरा लक्ष फक्त)** निधी खालीलप्रमाणे वितरीत करण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| अ.क्र | योजनेचे नाव | मंजूर तरतूद | पुनर्विनियोजना नतरची सुधारीत तरतूद | यापूर्वी दिलेली प्रशासकीय मान्यता | यापूर्वी वितरीत निधी | **या आदेशान्वये वितरीत निधी** | एकूण वितरीत निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | **कार्यान्वयीन यंत्रणा - कार्यकारी अभियंता, (बांध), जिल्हा परिषद, परभणी** | | | | | | |
| 1 | इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण | 40.00 | 55.00 | 60.00 | 40.00 | **15.00** | 55.00 |
| | एकूण | 40.00 | 55.00 | 60.00 | 40.00 | **15.00** | 55.00 |

**(अक्षरी रुपये पंधरा लक्ष फक्त)**

## अटी व शर्ती

1. सदर कामाची/योजनेची अंमलबजावणी आपल्या प्रशासकीय विभागाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचना/निकषानुसारच करण्यात यावी तसेच शासन स्तरावर मंजुर केलेल्या कामाची व्दिरुक्ती होणार नाही व सदरीचे काम अनुज्ञेय असल्याची खात्री करुनच सदर काम अनुज्ञेय असल्यासच कामास सुरुवात करावी.

2. **सदरील कामाची गुणवत्ता उत्कृष्ट राहील याची दक्षता घेण्यात यावी. सदर कामे पुर्ण झाली आहेत याची खात्री करुनच अंतिम देयक अदाई करण्यापुर्वी कामनिहाय कामांचे फोटो सादर केल्यानंतरच सदर निधी वितरित करण्यात यावा. प्रत्यक्ष खर्चात बचत झाल्यास सदर निधी तातडीने शासनखाती जमा करण्यात यावा.**

3. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेला आहे त्या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठीच खर्च करण्यात यावा इतर कोणत्याही योजनांवर/कामावर खर्च करण्यात येवू नये.

4. या योजनेंतर्गतच्या कामांना आवश्यक असलेली प्रशासकीय मान्यता/तांत्रीक मंजूरी जिल्हा परिषदेच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची रांहील या अटीवरच निधी वितरीत करण्यात येत आहे.

5. प्रशासकीय मान्यता रक्कमेपेक्षा जादा खर्च केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

6. या योजनेंतर्गतच्या कामांना आवश्यक असलेली तांत्रिक मंजूरी/प्रशासकीय मान्यता जिल्हा परिषदेच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची राहील. तांत्रिक मंजूरी व प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतरच योजनांतर्गत कामावर खर्च करण्याच्या अटीवरच निधी वितरीत करण्यात येत आहे. तसेच प्रशासकीय मान्यतेपेक्षा जादा खर्च केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील. तांत्रिक मंजूरी / प्रशासकीय मान्यतेच्या प्रती या कार्यालयास सादर कराव्यात.

7. सदर सहाय्यक अनुदानाची उपयोगीता प्रमाणपत्रे व पुर्णत्वाचे दाखले महालेखापाल कार्यालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी. तसेच या योजनांवर झालेल्या खर्चाचे महालेखापाल यांचे कार्यालयात नोंद झालेल्या खर्चाशी ताळमेळ घालुन त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

8. या योजनेंतर्गत कामाचे त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन घेण्यात येवू शकेल तेव्हा या योजनेंतर्गत होणाऱ्या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा आणि दरमहा 5 तारखेपुर्वी या कार्यालयास प्रगती अहवाल सादर करावा.

9. आवश्यक असलेल्या कामाबाबत निविदा मागविणे, स्वीकृत करणे तसेच खरेदी बाबतचे सर्व अधिकार प्रचलित पध्दतीनुसार राहतील.

10. योजनेच्या अंमलबजावणीवर, खर्चावर व तांत्रीक बाबीवर संबधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे नियंत्रण राहील.

11. या योजनेतील गैरव्यव्हार, लेखा आक्षेप लोकलेखा समिती, विधीमंडळ कामकाज इत्यादी बाबीसाठी संबधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.

## File No.PBN-18021(11)/83/2019-PBN-DPO-COLLECTOR OFFICE-PARBHANI

12. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेला निधी चालू आर्थिक वर्ष 2018-19 अखेरीस अखर्चित राहिल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची राहील.

13. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीचा खर्च खालिल लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

**लेखाशिर्ष - नियोजन विभाग - मागणी क्रमांक (भांडवली) ओ - 51**

5054, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च

04, जिल्हा व इतर मार्ग

800, इतर खर्च

(49) जिल्हा योजना - परभणी

(49)(02) इतर जिल्हा रस्त्याचा विकास व मजबुतीकरण

(5054 4685) 53 - मोठी बांधकामे

प्रति,

कार्यकारी अभियंता,
बांधकाम, जिल्हा परिषद,
परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

1. महालेखापाल, नागपूर - 2
2. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी
3. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

Signature valid

Digitally signed by P SIVA SANKAR
Date: 2019.03.31 1?:56:38 IST
Reason: Approved